लोकमत



# के.के. वाघ महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** के.के. वाघ शिक्षण संस्था संचलित वाघ अभियांत्रिकी येथे आय.ओ.सी.एल कंपनी तर्फे नुकताच ' सतर्कता जागरुकता सप्ताह' (व्हिजिलन्स वीक) ची सुरुवात करण्यात आली. यानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते

या वक्तृत्व स्पर्धेचा विषय ' राष्ट्राच्या समृद्धीसाठी अखंडतेची संस्कृती / सत्यनिष्ठा की संस्कृतीसे राष्ट्र की समृद्धी ' हा होता.

प्राचार्य डॉ. केशव नांदुरकर यांनी स्वागत केले. यामध्ये २० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी भ्रष्टाचार मुक्त भारत बनवू अशी प्रतिज्ञा घेतली.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. वर्षा तिडके व प्रा. स्नेहल जाधव यांनी कामकाज केले. प्रथम क्रमांक साक्षी तिडके, द्वितीय क्रमांक लक्ष्मी अहिरे आणि तृतीय क्रमांक श्रेया करोडे यांनी पटकावला.